# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्यालय विरार (पूर्व)

## मा.सर्वसाधारण सभा

सर्वसाधारण सभा ठराव क्र.०५ सभा सुचना क्र.०३ दिनांक १४/०७/२०१७

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१९ दिनांक.२०/०१/२०१६ बाब क्र. २९ व ३० क्रीडा अनुदान देणेबाबतच्या नियमावलीमध्ये तसेच अनुदानामध्ये अंशत बदल करुन नव्याने धोरण निश्चित करणे.
**वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू यांना रोख बक्षिस देऊन गौरविण्याच्या योजनेची नियमावली**

**प्रस्तावाचा मजकुर :-** उपरोक्त विषयानुसार सादर करण्यांत येते की, मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१९ दिनांक.२०/०१/२०१६ मधील प्रस्तावात नमुद अ.क्र.२९ व अ.क्र.३० मधील बाब अ,ब, क,ड व इ प्रमाणे क्रीडा अनुदान धोरणाची नियमावली खालील प्रमाणे आहे.

२९) महाराष्ट्र राज्यात किमान १५ वर्षे व वसई विरार महानगरपालिका हद्दीत किमान ३ वर्षे वास्तव्य असणा-या कुटूंबातील खेळाडू व्यक्तीची भारतीय खेळ प्राधिकरणाने प्रशिक्षणासाठी निवड केल्यास अशा खेळाडूला सराव शिबीरामध्ये सहभागी होण्यासाठी जाण्यास होणा-या प्रवास, निवास, भोजन, पौष्टिक आहार इत्यादीवरील खर्चापोटी महानगरपालिकेकडून प्रशिक्षण कालावधीसाठी दरमहा रु. ६०००/- प्रशिक्षण भत्ता देण्यांत येईल.

**सर्वसाधारण नियम व अटी :** प्रशिक्षण भत्त्याची मागणी करणा-या खेळाडूने आपल्या अर्जासोबत सक्षम प्राधिका-यानी दिलेली रहिवास प्रमाणपत्रे, शिधावाटप पत्रिका/ मतदार ओळखपत्र/ आधार कार्ड, नगरसेवकाने दिलेले वास्तव्य पडताळणी पत्र, भारतीय खेळ प्राधिकरणाकडून प्रशिक्षणासाठी निवड झाल्याचे पत्र व सराव शिबीरामध्ये सहभागी झाल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

३०) महाराष्ट्र राज्यात किमान १५ वर्षे व वसई विरार महानगरपालिका हद्दीत किमान ३ वर्षे वास्तव्य असणा-या कुटूंबातील खेळाडू व्यक्तीने खेळांच्या स्पर्धांमध्ये सहभागी होऊन पारितोषिक मिळवले असेल अथवा त्यास पारितोषिक मिळाले नसेल, तरीही अशा खेळाडूचा महानगरपालिकेकडून यथोचित गौरव करण्यात येईल व त्यास प्रोत्साहनपर पारितोषिक किंवा प्रोत्साहनपर अनुदान देण्यांत येईल.

अ) भारतीय ऑलिंपिक संघटना, सर्व खेळांच्या अधिकृत राष्ट्रीय क्रीडा संघटना व सर्व खेळांच्या अधिकृत राज्य क्रीडा संघटनांनी आयोजित केलेल्या राज्य अजिंक्यपदाच्या क्रीडा स्पर्धा व राज्य अजिंक्यपदाच्या शालेय क्रीडा स्पर्धा यामधील सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके मिळविणा-या स्पर्धकांना पुढीलप्रमाणे प्रोत्साहनपर पारितोषिके देऊन महानगरपालिकेकडून त्यांचा गौरव करण्यांत येईल.
सुवर्ण : रु. ५००००/- रौप्य : रु. ४००००/- कांस्य : रु. ३००००/-
स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पारितोषिक मिळवू न शकणा-या स्पर्धकाला प्रोत्साहनपर अनुदान रु. २००००/-

ब) भारतीय ऑलिंपिक संघटना, सर्व खेळांच्या अधिकृत राष्ट्रीय क्रीडा संघटना व सर्व खेळांच्या अधिकृत राज्य क्रीडा संघटनांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय अजिंक्य पदाच्या क्रीडा स्पर्धा व राष्ट्रीय अजिंक्यपदाच्या शालेय क्रीडा स्पर्धा यामधील सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके मिळविणा-या स्पर्धकांना पुढीलप्रमाणे प्रोत्साहनपर पारितोषिके देऊन महानगरपालिकेकडून त्यांचा गौरव करण्यांत येईल.
सुवर्ण : रु. १०००००/- रौप्य : रु. ८००००/- कांस्य : रु. ६००००/-
स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पारितोषिक मिळवू न शकणा-या स्पर्धकाला प्रोत्साहनपर अनुदान रु. ४००००/-

क) जागतिक ऑलिंपिक संघटना, भारतीय ऑलिंपिक संघटना, सर्व खेळांच्या अधिकृत राष्ट्रीय व राज्य क्रीडा संघटनांच्या सहभागाने व मान्यतेने आयोजित करण्यात आलेल्या परंतु ऑलिंपिक, जागतिक क्रीडा स्पर्धा, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा व आशियाई क्रीडा स्पर्धा या स्पर्धा व्यतिरिक्त आयोजित करण्यांत आलेल्या अन्य आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके मिळविणा-या स्पर्धकांना पुढीलप्रमाणे प्रोत्साहनपर पारितोषिके देऊन महानगरपालिकेकडून त्यांचा गौरव करण्यांत येईल.
सुवर्ण : रु. २०००००/- रौप्य : रु. १५००००/- कांस्य : रु. १०००००/-

स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पारितोषिक मिळवू न शकणा-या स्पर्धकाला प्रोत्साहनपर अनुदान रु. ७५०००/-

ड) ऑलिंपिक, जागतिक क्रीडा स्पर्धा, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा व आशियाई क्रीडा स्पर्धा यास्पर्धांमध्ये सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके मिळविणा-या स्पर्धकांना पुढीलप्रमाणे प्रोत्साहनपर पारितोषिके देऊन महानगरपालिकेकडून त्यांचा गौरव करण्यांत येईल.

• ऑलिंपिक: सुवर्ण : रु. १००००००००/- रौप्य : रु. ७५०००००/- कांस्य : रु. ५००००००/-
स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पारितोषिक मिळवू न शकणा-या स्पर्धकाला प्रोत्साहन पर अनुदान रु.१००००००/-

• जागतिक क्रीडा स्पर्धा : सुवर्ण : रु. ७५०००००/- रौप्य : रु. ५००००००/- कांस्य : रु. २५०००००/-
स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पारितोषिक मिळवू न शकणा-या स्पर्धकाला प्रोत्साहनपर अनुदान रु. १००००००/-

• राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा : सुवर्ण : रु. ५००००००/- रौप्य : रु. ३००००००/- कांस्य : रु. २००००००/-
स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पारितोषिक मिळवू न शकणा-या स्पर्धकाला प्रोत्साहनपर अनुदान रु. ५०००००/-

• आशियाई क्रीडा स्पर्धा : सुवर्ण : रु. २५०००००/- रौप्य : रु. २००००००/- कांस्य : रु. १५०००००/-
स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पारितोषिक मिळवू न शकणा-या स्पर्धकाला प्रोत्साहनपर अनुदान रु. ५०००००/-

इ) जागतिक ऑलिंपिक संघटना, भारतीय ऑलिंपिक संघटना, सर्व खेळांच्या अधिकृत राष्ट्रीय व राज्य क्रीडा संघटनांच्या सहभागाशिवाय आयोजित करण्यात आलेल्या राज्य स्तरावरील, राष्ट्रीय स्तरावरील व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमधील सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके मिळविणा-या स्पर्धकांना पुढीलप्रमाणे प्रोत्साहनपर पारितोषिके देऊन महानगरपालिकेकडून त्यांचा गौरव करण्यात येईल.

• राज्य स्तरावरील स्पर्धा : सुवर्ण : रु. २५०००/- रौप्य : रु. २००००/- कांस्य : रु. १५०००/-
स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पारितोषिक मिळवू न शकणा-या स्पर्धकाला प्रोत्साहनपर अनुदान रु. १००००/-

• राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा: सुवर्ण : रु. ५००००/- रौप्य : रु. ४००००/- कांस्य :रु. ३००००/- स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पारितोषिक मिळवू न शकणा-या स्पर्धकाला प्रोत्साहनपर अनुदान रु. २००००/-

• आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा : सुवर्ण : रु. १०००००/- रौप्य : रु. ८००००/- कांस्य : रु. ६००००/-
स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पारितोषिक मिळवू न शकणा-या स्पर्धकाला प्रोत्साहनपर अनुदान रु. ४००००/-

**महत्वाची सूचना :** एका आर्थिक वर्षात कोणत्याही एका स्पर्धेसाठी स्पर्धकाला प्रोत्साहनपर पारितोषिक किंवा प्रोत्साहनपर अनुदानाची मागणी करता येईल. स्पर्धकाने कोणत्याही स्पर्धेमध्ये जरी एकापेक्षा अधिक पदके प्राप्त केली असली तरी तो त्या स्पर्धेसाठी देय असलेल्या अधिकतम रक्कमेच्या एकाच पारितोषिकासाठी पात्र समजण्यात येईल.

**सर्वसाधारण नियम व अटी -** प्रोत्साहनपर पारितोषिक मिळवण्यासाठी किंवा प्रोत्साहनपर अनुदानाची मागणी करणा-या स्पर्धकाने आपल्या अर्जासोबत सक्षम प्राधिका-यानी दिलेली रहिवास प्रमाणपत्रे, शिधावाटप पत्रिका/ मतदार ओळखपत्र/ आधार कार्ड, नगरसेवकाने दिलेले वास्तव्य पडताळणी पत्र, क्रीडा संघटनेची व स्पर्धेची असलेली संलग्नता, स्पर्धेचा दर्जा, स्पर्धेत निवड व सहभागी झाल्याचा पुरावा, पारितोषिक मिळवले असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

तरी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१९ दि.२१/०१/२०१६ मधील अ.क्र.२९ व अ.क्र.३० बाब क्र. अ.ब.क.ड व ई मध्ये खालील प्रमाणे अनुदानाचा प्रकार व देय अनुदानामध्ये अंशत बदल करुन नव्याने धोरण निश्चित करणेबाबतचा प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.

## परिशिष्ट (अ)

**अ.क्र.२९** - महाराष्ट्र राज्यात किमान १५ वर्षे व वसई विरार महानगरपालिका हद्दीत किमान ३ वर्षे वास्तव्य असणा-या कुटूंबातील खेळाडू व्यक्तीची भारतीय खेळ प्राधिकरणाने प्रशिक्षणासाठी निवड केल्यास अशा खेळाडूला सराव शिबीरामध्ये सहभागी होण्यासाठी जाण्यास होणा-या प्रवास, निवास, भोजन, पौष्टिक आहार इत्यादीवरील खर्चापोटी महानगरपालिकेकडून प्रशिक्षण कालावधीसाठी दरमहा रु. ६०००/- प्रशिक्षण भत्ता देण्यात येईल.

# परिशिष्ट (ब)

अ.क्र ३०) वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू यांना रोख बक्षिस देऊन गौरविण्याच्या योजनेची नियमावली खालीलप्रमाणे —

| अ. क्र | अनुदानाचा प्रकार | स्पर्धेचे स्तर | सुवर्ण | रौप्य | कांस्य | सहभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | शासनाच्या वतीने आयोजित करण्यांत येणा-या राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये पदक विजेता व स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पदक मिळवू न शकणा-या स्पर्धकाला प्रोत्साहन पर अनुदान. | राज्यस्तरीय | रु.२५,०००/- | रु.२०,०००/- | रु.१५,०००/- | रु.१०,०००/- |
| | | राष्ट्रीय स्तरीय | रु.५०,०००/- | रु.४०,०००/- | रु.३०,०००/- | रु.२०,०००/- |
| | | आंतरराष्ट्रीय स्तरीय | रु.१,००,०००/- | रु.८०,०००/- | रु.६०,०००/- | रु.४०,०००/- |
| २) | शासनाच्या अधिकृत राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरीय क्रीडा संघटना यांच्या सहभागाने व मान्यतेने आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये पदक विजेता व स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पदक मिळवू न शकणा-या स्पर्धकाना प्रोत्साहन पर अनुदान. | राज्यस्तरीय | रु.२५,०००/- | रु.२०,०००/- | रु.१५,०००/- | रु.१०,०००/- |
| | | राष्ट्रीय स्तरीय | रु.५०,०००/- | रु.४०,०००/- | रु.३०,०००/- | रु.२०,०००/- |
| | | आंतरराष्ट्रीय स्तरीय | रु.१,००,०००/- | रु.८०,०००/- | रु.६०,०००/- | रु.४०,०००/- |
| ३) | शासनाच्या अधिकृत राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरीय क्रीडा संघटना यांची मान्यता न घेता आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये पदक विजेता स्पर्धकाना प्रोत्साहन पर अनुदान. | राज्यस्तरीय | रु.१५,०००/- | रु.१०,०००/- | रु.५,०००/- | - |
| | | राष्ट्रीय स्तरीय | रु.३०,०००/- | रु.२०,०००/- | रु.१०,०००/- | - |
| | | आंतरराष्ट्रीय स्तरीय | रु.४०,०००/- | रु.३०,०००/- | रु.२०,०००/- | - |
| ४) | शासनाच्या वतीने व शासनाच्या अधिकृत राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरीय क्रीडा संघटना यांच्या सहभागाने व मान्यतेने आयोजित केलेल्या (मास्टर्स ॲथलेटिक्स स्पर्धा) स्पर्धेमध्ये पदक विजेता व स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पदक मिळवू न शकणा-या स्पर्धकाना प्रोत्साहन पर अनुदान. | राज्यस्तरीय | रु.५०,०००/- | रु.४०,०००/- | रु.३०,०००/- | - |
| | | राष्ट्रीय स्तरीय | रु.७५,०००/- | रु.६०,०००/- | रु.४०,०००/- | - |
| | | आंतरराष्ट्रीय स्तरीय | रु.१,००,०००/- | रु.८०,०००/- | रु.६०,०००/- | रु.४०,०००/- |
| ५) | जागतिक (वर्ल्ड मास्टर्स गेम्स) मास्टर्स ॲथलेटिक्स क्रीडा स्पर्धेमध्ये पदक विजेता व स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पदक मिळवू न शकणा-या स्पर्धकाना प्रोत्साहन पर अनुदान. | | रु.१,००,०००/- | रु.८०,०००/- | रु.६०,०००/- | रु.४०,०००/- |
| ६) | जार्गतिक पॅरा क्रीडा स्पर्धेमध्ये पदक विजेता व स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पदक मिळवू न शकणा-या स्पर्धकाना प्रोत्साहन पर अनुदान. | | रु.१,५०,०००/- | रु.१,००,०००/- | रु.७५,०००/- | रु.५०,०००/- |
| ७) | पॅरा आशियाई क्रीडा स्पर्धेमध्ये पदक विजेता व स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पदक मिळवू न शकणा-या स्पर्धकाना प्रोत्साहन पर अनुदान. | | रु.२,००,०००/- | रु.१,५०,०००/- | रु.७५,०००/- | रु.५०,०००/- |
| ८) | पॅरा ऑलिंपिक स्पर्धेमध्ये पदक विजेता व स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पदक मिळवू न शकणा-या स्पर्धकाना प्रोत्साहन पर अनुदान. | | रु.१२,००,०००/- | रु.८,००,०००/- | रु.४,००,०००/- | रु.२,००,०००/- |
| ९) | आशियाई क्रीडा स्पर्धेमध्ये पदक विजेता व स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पदक मिळवू न शकणा-या स्पर्धकाना प्रोत्साहन पर अनुदान. | | रु.४,००,०००/- | रु.३,००,०००/- | रु.२,००,०००/- | रु.१,००,०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १०) | राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेमध्ये पदक विजेता व स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या पंरतु कोणतेही पदक मिळवू न शकणा-या स्पर्धकाना प्रोत्साहन पर अनुदान. | | रु.४,००,०००/- | रु.३,००,०००/- | रु.२,००,०००/- | रु.१,००,०००/- |
| ११) | जागतिक क्रीडा स्पर्धेमध्ये पदक विजेता व स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या पंरतु कोणतेही पदक मिळवू न शकणा-या स्पर्धकाना प्रोत्साहन पर अनुदान. | | रु.१२,००,०००/- | रु.८,००,०००/- | रु.४,००,०००/- | रु.२,००,०००/- |
| १२) | ऑलिंपिक स्पर्धेमध्ये पदक विजेता व स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या पंरतु कोणतेही पदक मिळवू न शकणा-या स्पर्धकाना प्रोत्साहन पर अनुदान. | | रु.४०,००,०००/- | रु.३०,००,०००/- | रु.२०,००,०००/- | ५,००,०००/- |

# परिशिष्ट (क)

**अ.क्र ३०)** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त सांघिक स्पर्धाप्रकारातील विजेता खेळाडू यांना रोख बक्षिस देऊन गौरविण्याच्या योजनेची नियमावली पुढीलप्रमाणे -

| अ. क्र | अनुदानाचा प्रकार | स्पर्धेचे स्तर | सुवर्ण | रौप्य | कांस्य |
|---|---|---|---|---|---|
| १) | शासनाच्या वतीने आयोजित करण्यांत येणा-या राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरीय साघिंक क्रीडा स्पर्धेमध्ये पदक विजेता संघातील स्पर्धकाला प्रोत्साहनपर अनुदान. | राज्यस्तरीय | रु.२०,०००/- | रु.१०,०००/- | रु.५,०००/- |
| | | राष्ट्रीय स्तरीय | रु.३०,०००/- | रु.२०,०००/- | रु.१०,०००/- |
| | | आंतरराष्ट्रीय स्तरीय | रु.५०,०००/- | रु.४०,०००/- | रु.२०,०००/- |
| २) | शासनाच्या अधिकृत राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरीय क्रीडा संघटना यांच्या सहभागाने व मान्यतेने आयोजित केलेल्या साघिंक क्रीडा स्पर्धेमध्ये पदक विजेता संघातील स्पर्धकाला प्रोत्साहनपर अनुदान. | राज्यस्तरीय | रु.२०,०००/- | रु.१०,०००/- | रु.५,०००/- |
| | | राष्ट्रीय स्तरीय | रु.३०,०००/- | रु.२०,०००/- | रु.१०,०००/- |
| | | आंतरराष्ट्रीय स्तरीय | रु.५०,०००/- | रु.४०,०००/- | रु.२०,०००/- |
| ३) | शासनाच्या अधिकृत राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरीय क्रीडा संघटना यांची मान्यता न घेता आयोजित केलेल्या साघिंक क्रीडा स्पर्धेमध्ये पदक विजेता संघातील स्पर्धकाला प्रोत्साहनपर अनुदान. | राज्यस्तरीय | रु.१०,०००/- | रु.७,०००/- | रु.५,०००/- |
| | | राष्ट्रीय स्तरीय | रु.२०,०००/- | रु.१५,०००/- | रु.१०,०००/- |
| | | आंतरराष्ट्रीय स्तरीय | रु.४०,०००/- | रु.३०,०००/- | रु.२०,०००/- |

# परिशिष्ट (ड)

**वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील खेळाडूंना साहसी क्रीडा प्रकाराना उत्तेजन याद्वारे रोख बक्षिस देऊन गौरविण्याच्या योजनेची नियमावली खालीलप्रमाणे -**

साहसी स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंना अनुदान :- मुलांमध्ये धैर्य, चिकाटी, संघिक भावना,सुप्त गुणांना चालना देऊन सर्वांगीण विकास करण्यासाठी साहसी खेळांच्या बाबी अधिक फायदेशीर आहेत. राष्ट्रीय स्तरावर नियमित होणारे स्पर्धात्मक क्रीडा प्रकार,केंद्र शासनाद्वारे साहसी क्रीडा प्रकाराला पुरस्कृत करणा-या योजना इ.विचार करता साहसी क्रीडा प्रकार तीन भागात विभागल्या जातात (१) जल क्रीडा प्रकार (२) वायु क्रीडा प्रकार (३) स्थल क्रीडा प्रकार या तीन प्रकारामध्ये स्पर्धात्मक व अस्पर्धात्मक (मनोरंजनात्मक)अशी बाबी आहेत. साहसी क्रीडा अंतर्गत खालील स्पर्धा प्रकारांचा समावेश आहे. जल क्रीडा प्रकारामधील कॅनाईंग, वॉटर स्कीईंग, रोईंग,याटिंग,स्क्युबा डायव्हिंग,सेलिंग इत्यादी व वायु क्रीडा प्रकारांमधील पॅराग्लायडिंग,पॅरासेलिंग,हॉट एअर बलुनिंग इत्यादी तसेच स्थल क्रीडा प्रकार स्पोर्ट क्लाईंबिंग, रॉक क्लाईंबिंग,ट्रेकिंग,माऊंटन सायकलिंग,ऑल टेरेन बाइक,झीप लाईन इत्यादी साहसी खेळाचे प्रकार महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २०१२ क्रीडा व युवक कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य यांनी निर्गमित केलेल्या पुस्तिकेत नमुद आहे.साहसी खेळांचा विकास होण्यासाठी राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यांत येते. यामध्ये प्रामुख्याने सेलिंग, पॅराग्लायडिंग, स्पोर्टस व रॉक क्लाईंबिंग, समुद्र व खाडी पोहणे, सायकलींग या स्पर्धांचा समावेश होतो. यासाठी व वरील नमुद प्रमाणे खेळामध्ये प्राविण्य संपादन करणा-या खेळाडूंना प्रोत्साहीत करणे आवश्यक आहे. तरी वरील खेळांचा समावेश क्रीडा नियमावलीचा परिशिष्ठ (ड) मध्ये करुन घेवून, त्यांना प्रोत्साहन पर पुढीलप्रमाणे अनुदान देण्यात येईल.

| अ.क्र | अनुदानाचा प्रकार | स्पर्धेचे स्तर | अनुदान |
|---|---|---|---|
| १) | महाराष्ट्र राज्यात किमान १५ वर्षे व वसई विरार महानगरपालिका हद्दीत किमान ३ वर्षे वास्तव्य असणा-या कुटूंबातील खेळाडू व्यक्ती जो साहसी क्रीडा प्रकारात स्वताचे उल्लेखनीय विक्रम व दर्जेदार कामगीरी केलेल्या खेळाडूंना साहसी क्रीडा प्रकाराना उत्तेजन याद्वारे खेळाडूंना प्रोत्साहनपर अनुदान. | राज्यस्तरीय | ५०,०००/- |
| | | राष्ट्रीय स्तरीय | १,००,०००/- |
| | | आंतरराष्ट्रीय स्तरीय | २,००,०००/- |
| **परिशिष्ठ ड मध्ये नमुद साहसी स्पर्धा प्रकारामध्ये एखाद्या खेळाडूने स्पर्धात्मक व अस्पर्धात्मक खेळामध्ये राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर किर्तीमान स्थापित केल्यास त्यांस अनुदान देण्यासाठी मा.स्थायी समितीच्या अंतिम मान्यतेसाठी मागणी अर्ज प्रस्ताव सादर** करण्यात येईल. | | | |

# परिशिष्ट (इ)

**पात्रतेचे निकष** -

१) एका आर्थिक वर्षात कोणत्याही एका स्पर्धेसाठी स्पर्धकाला प्रोत्साहनपर पारितोषिक किंवा प्रोत्साहनपर अनुदानाची मागणी करता येईल. स्पर्धकाने कोणत्याही स्पर्धेमध्ये जरी एकापेक्षा अधिक पदके प्राप्त केली असली तरी तो त्या स्पर्धेसाठी देय असलेल्या अधिकतम रक्कमेच्या एकाच पारितोषिकासाठी पात्र समजण्यात येईल.

२) परंतु एखादया स्पर्धकाने एका वर्षात अनुक्रमे राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेवून प्राविण्य मिळविले आहे, अशा स्पर्धकाने या अगोदर चालु वित्तीय वर्षात अनुदान घेतले आहे, परंतु त्याच वित्तीय वर्षात स्पर्धकाने पुढील स्तरावर सहभाग घेवून प्राविण्य मिळविले असल्यास नियोजित बक्षिसाच्या रक्कमेतुन यापुर्वी अदा केलेली रक्कम कपात करुन उर्वरित फरकाची रक्कम स्पर्धकास अदा करणेंत येईल.

३) खेळाडू हा एकापेक्षा अधिक खेळात सहभागी झालेला असला तरीही त्याला त्याच्या उच्चतम एकाच खेळाच्या विजेत्या प्रमाणपत्राप्रमाणे अनुदान देण्यांत येईल.

४) प्रोत्साहनपर पारितोषिक मिळवण्यासाठी किंवा प्रोत्साहनपर अनुदानाची मागणी करणा-या स्पर्धकाचा अर्ज.

५) स्पर्धेमध्ये खेळाडूचे निवड झाल्याचे पत्र.

६) स्पर्धेमध्ये सुवर्ण,रौप्य,कास्य पदक व सहभागी झाल्याचे प्रमाणपत्र.

७) महानगरपालिकेच्या सन्मा.नगरसेवक / नगरसेविका यांनी दिलेले खेळाडूचे वास्तव पडताळणी पत्र.

८) खेळाडूचे महाराष्ट्र राज्यात सलग १५ वर्षे वास्तव (अधिवास दाखला) असणे आवश्यक आहे.

९) खेळाडूचे आधार कार्ड, खेळाडूचे रेशन कार्ड, खेळाडूचे बॅंक अकाऊंट प्रत.

१०) शाळा/महाविद्यालय/खाजगी संस्था यांचे विद्यार्थी असल्यास संस्थेच्या लेटरहेडवर सही शिक्यासह पत्र.

११) विजेता स्पर्धकाने अनुदानाची मागणी स्पर्धा झालेल्या दिनांकापासून १ महिनांच्या आत करावी. तद्नतंर केलेले अर्ज ग्राह्य धरण्यांत येणार नाहीत.

# परिशिष्ट (ई)

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक :- एसएससी -२०१२/(१५४/१२)/उमाशि-२ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०००३२ दिनांक :- २१ एप्रिल, २०१५ मधील परिशिष्ट ड नुसार मान्यताप्राप्त खेळांची यादी प्रस्तावात प्रमाण नमुद आहे.

भारतीय खेळ महासंघ पुरस्कृत क्रीडा स्पर्धांमधील खेळ खालील प्रमाणे -

| अ.क्र | खेळ |
|---|---|
| १ | ॲथलेटिक्स |
| २ | आर्चरी |
| ३ | बॅडमिंटन |
| ४ | बास्केटबॉल |
| ५ | बॉक्सिंग |
| ६ | बेसबॉल |
| ७ | बुद्धिबळ |
| ८ | क्रिकेट |
| ९ | क्रिकेट विनू मंकड |
| १० | क्रिकेट सी.के.नायडू |
| ११ | सायकलिंग रोडरेस |
| १२ | फुटबॉल |
| १३ | तलवारबाजी |
| १४ | जिम्नॅस्टिक्स् |
| १५ | हॉकी |
| १६ | हॅण्डबॉल |
| १७ | ज्युदो |
| १८ | कबड्डी |

| | |
|---|---|
| १९ | खो-खो |
| २० | लॉनटेनिस |
| २१ | नेटबॉल |
| २२ | रोलर स्केटिंग क्वॉड व इनलाइन |
| २३ | रोलर हॉकी |
| २४ | रोलबॉल |
| २५ | रायफल शुटिंग |
| २६ | जलतरण, डायव्हिंग व वॉटरपोलो |
| २७ | सॉफ्टबॉल |
| २८ | टेबलटेनिस |
| २९ | तायक्वांदो |
| ३० | व्हॉलीबॉल |
| ३१ | कुस्ती |
| ३२ | वेटलिफ्टिंग |
| ३३ | योगा |
| ३४ | सुब्रतो कप फूटबॉल |
| ३५ | नेहरु कप हॉकी |
| ३६ | मल्लखांब |
| ३७ | बॉलबॅडमिंटन |
| ३८ | कॅरम |
| ३९ | डॉजबॉल |
| ४० | किकबॉक्सिंग |
| ४१ | सिकई मार्शल आर्ट |
| ४२ | थ्रोबॉल |

भारतीय क्रिडा प्राधिकरण पुरस्कृत ग्रामीण राजीव गांधी खेल अभियान या क्रिडा स्पर्धाचे खेळ.

| अ.क्र. | **खेळ** |
|---|---|
| १ | ग्रामीण गट क्र. १ - ॲथलेटिक्स तायक्वांदो व्हॉलीबॉल |
| २ | ग्रामीण गट क्र. २ - कबड्डी<br>खो-खो |
| ३ | ग्रामीण गट क्र. ३ - फूटबॉल<br>वेटलिफ्टिंग |
| ४ | ग्रामीण गट क्र. ४ - धनुर्विद्या |
| ५ | ग्रामीण गट क्र. ५ - कुस्ती |

भारतीय क्रिडा प्राधीकरण पुरस्कृत महिला / राजीव गांधी खेळ अभियान (RGKA) क्रिडा स्पर्धाचे खेळ.

| अ.क्र. | खेळ |
|---|---|
| १ | महिला गट क्र. १ — बास्केटबॉल, जलतरण, जिम्नॅस्टिक्स |
| २ | महिला गट क्र. २ — हॅण्डबॉल, हॉकी, टेनिस |
| ३ | महिला गट क्र. ३ — ॲथलेटिक्स,बॅडमिंटन, टेबल टेनिस |
| ४ | महिला गट क्र. ४ — कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल |

ऑल इंडिया स्पोर्टस कौन्सिल फॉर दि डेफच्या क्रिडा स्पर्धाचे खेळ.

| अ.क्र. | खेळ |
|---|---|
| १ | मैदानी |
| २ | बॅडमिंटन |
| ३ | बास्केटबॉल |
| ४ | क्रिकेट |
| ५ | फूटबॉल |
| ६ | जलतरण |
| ७ | टेबल टेनिस |
| ८ | व्हॉलीबॉल |
| ९ | कुस्ती |

पॅरा ऑलिम्पिक कमिटी ऑफ इंडियाच्या क्रिडा स्पर्धांचे खेळ.

| अ.क्र. | खेळ |
|---|---|
| १ | मैदानी |

| | |
|---|---|
| २ | धनुर्विद्या |
| ३ | सिटिंग व्हॉलीबॉल |
| ४ | पॉवरलिफ्टिंग |
| ५ | रायफल शूटिंग |
| ६ | जलतरण |
| ७ | टेबल टेनिस |
| ८ | व्हिल चेअर फेन्सिंग |

# परिशिष्ट (उ)

परिशिष्ठ (ई) मध्ये महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने शासन निर्णयानुसार विहित केलेले भारतीय खेळ महासंघ पुरस्कृत क्रीडा स्पर्धांमधील खेळांचा उल्लेख आहे. याव्यतिरिक्त इतर क्रीडा स्पर्धाप्रकार ज्यांचा परिशिष्ठ (ई) मध्ये उल्लेख नाही, अशा स्पर्धा प्रकारांचे महापालिका त्या-त्या वेळी आयोजन करुन या स्पर्धामध्ये विजेता स्पर्धकांना प्रोत्साहनपर पारितोषिके देऊन महानगरपालिकेकडून त्यांचा गौरव करण्यांत येईल.

वरील प्रस्तावातील नमुद अ.क्र.२९ व अ.क्र.३० मधील बाब अ,ब, क,ड व इ प्रमाणे मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१९ दिनांक.२०/०१/२०१६ नुसार नियमावली मंजुर असून सदर नियमावली व त्यानुसार द्यावयाचे अनुदानात बदल करुन परिशिष्ठ "अ.ब.क व ड" यामध्ये अनुदानांचा प्रकार व खेळाडूस द्यावयाचे अनुदान.
त्याच प्रमाणे परिशिष्ठ "इ" मध्ये अनुदान पात्रतेचे निकष
परिशिष्ट "ई" मध्ये महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने विहित केलेले भारतीय खेळ महासंघ पुरस्कृत क्रीडा स्पर्धांमधील खेळांचा उल्लेख प्रस्तावात करण्यांत आला आहे.

तसेच परिशिष्ठ "उ" परिशिष्ठ (ई) मध्ये महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने शासन निर्णयानुसार विहित केलेले भारतीय खेळ महासंघ पुरस्कृत क्रीडा स्पर्धांमधील खेळांचा उल्लेख आहे. याव्यतिरिक्त इतर क्रिडा स्पर्धाप्रकार ज्यांचा परिशिष्ठ (ई) मध्ये उल्लेख नाही, अशा स्पर्धा प्रकारांचे महापालिका त्या-त्या वेळी आयोजन करुन या स्पर्धामध्ये विजेता स्पर्धकांना प्रोत्साहनपर पारितोषिके देऊन महानगरपालिकेकडून त्यांचा गौरव करण्यांत येईल.

सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात खेळ व संघ दत्तक घेणेसह विविध स्पर्धांसाठी खेळ व संघानें प्रायोजकत्व स्विकारणे तसेच संघाना व खेळाडूंना व्यक्तीगत अर्थसहाय्य देणे या लेखाशिर्षखाली रुपये १,००,००,०००/- इतकी करण्यांत आलेली आहे.

वरील प्रस्तावात नमुद नियमावली व त्याअनुसरुन द्यावयाचे अनुदान यासाठी तयार केलेले सर्वसाधरण नियम व अटी यांना अनुलक्षून महानगरपालिका हद्दीतून आंतरराष्ट्रीय व ऑलिम्पिक दर्जाचे पदक विजेते खेळाडू तयार होण्यास मदत होणार आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा.महासभेच्या मान्यतेसाठी सादर.

**प्रस्तावाचा निर्णय / ठराव** :- प्रस्तावात नमुद वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू यांना रोख बक्षिस देऊन गौरविण्याच्या योजनेची नियमावलीच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यांत आली त्यानुसार,

प्रस्तावातील नमुद अ.क्र.२९ व अ.क्र.३० मधील बाब अ,ब, क,ड व इ प्रमाणे मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१९ दिनांक.२०/०१/२०१६ नुसार नियमावली मंजुर असून सदर नियमावली व त्यानुसार द्यावयाचे अनुदानात बदल करुन परिशिष्ठ "अ,ब,क व ड" यामध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे अनुदानांचा प्रकार व खेळाडूस द्यावयाचे अनुदानास आजची ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.

त्याच प्रमाणे प्रस्तावातील परिशिष्ठ "इ" मध्ये अनुदान पात्रतेचे निकष प्रस्तावीत केलेले आहेत त्या निकषास ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

परिशिष्ट "ई" मध्ये महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने विहित केलेले भारतीय खेळ महासंघ पुरस्कृत क्रीडा स्पर्धांमधील खेळांचा उल्लेख प्रस्तावात करण्यांत आला आहे. प्रस्तावातील नमुद स्पर्धाप्रकारांना खेळांना अनुदान देणेसाठी ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.

तसेच प्रस्तावातील नमुद परिशिष्ठ "उ" परिशिष्ठ (ई) मध्ये महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने शासन निर्णयानुसार विहित केलेले भारतीय खेळ महासंघ पुरस्कृत क्रीडा स्पर्धांमधील खेळांचा उल्लेख आहे. याव्यतिरिक्त इतर क्रिडा स्पर्धाप्रकार ज्यांचा परिशिष्ठ (ई) मध्ये उल्लेख नाही, अशा स्पर्धा प्रकारांचे महापालिकेने त्या-त्या वेळी आयोजन करुन या स्पर्धामध्ये विजेता स्पर्धकांना प्रोत्साहनपर पारितोषिके देऊन

महानगरपालिकेकडून त्यांचा गौरव करण्यांत यावा, यासाठी अशा स्पर्धांचे विविध स्तरावर आयोजन करावे यासाठी ही सभा ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.

याप्रस्तावाच्या अनुषंगाने दाखल केलेल्या उपसुचनांचा विचार करिता खालील उपसुचनांचा या ठरावात अंतर्भाव करणेस व त्यांची अंमलबजावणी करणेंस ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**उपसुचना क्र.१ नुसार**

प्रस्तावातील परिशिष्ट (ब) मधील अ.क्र.४ यामधील मास्टर्स ॲथलेटीक्स क्रीडा स्पर्धा असे नमुद आहे. **त्याऐवजी मास्टर्स क्रीडा स्पर्धा** अशी दुरूस्ती करणेच्या उपसुचनेस ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**उपसुचना क्र.२ नुसार**

प्रस्तावातील नमुद परिशिष्ट (ब) मधील अ.क्र.५ मध्ये जागतिक (वर्ल्ड मास्टर्स गेम्स) मास्टर्स ॲथलेटिक्स क्रीडा स्पर्धेमध्ये पदक विजेता व स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतू कोणतेही पदक मिळवू न शकणा-या स्पर्धकांना प्रोत्साहन पर अनुदान असे नमुद आहे.

**त्याऐवजी अधिकृत राज्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा संघटना यांच्या सहभागाने व मान्यतेने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये पदक विजेता व स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पदक मिळवू न शकणा-या स्पर्धकाना प्रोत्साहन पर अनुदान अशी दुरूस्ती करणेच्या उपसुचनेस ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.**

**उपसुचना क्र.३ नुसार**

सदर प्रस्तावातील परिशिष्ठ ब, क. ड व ई यामधील क्रीडा स्पर्धेत विजेत्या खेळाडुंच्या मार्गदर्शकांना द्यावयाचे अनुदान

- ✓ परिशिष्ट (ब) अ.क्र.१ व २ या मधील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक विजेता स्पर्धकांच्या क्रिडा मार्गदर्शक यांना रुपये १०,०००/- अनुदान.
- ✓ परिशिष्ट (ब) अ.क्र.१ व २ या मधील आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक विजेता स्पर्धकांच्या क्रिडा मार्गदर्शक यांना रुपये १५,०००/- अनुदान.
- ✓ अ.क्र.४ मधील आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक विजेता स्पर्धकाच्या क्रिडा मार्गदर्शक यांना रुपये १५,०००/- अनुदान,
- ✓ अ.क्र.५ मधील सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक विजेता स्पर्धकाच्या क्रिडा मार्गदर्शक यांना रुपये १५,०००/- अनुदान,
- ✓ अ.क्र.६,७,९ व १० यामधील सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक विजेता स्पर्धकाच्या क्रिडा मार्गदर्शक यांना रुपये २०,०००/- अनुदान,
- ✓ अ.क्र.८ व ११ यामधील सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक विजेता स्पर्धकाच्या क्रिडा मार्गदर्शक यांना रुपये ३०,०००/- अनुदान,
- ✓ अ.क्र.१२ यामधील सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक विजेता स्पर्धकाच्या क्रिडा मार्गदर्शक रुपये ५०,०००/- अनुदान.

**तसेच परिशिष्ट (क) सांघिक स्पर्धा यामधील**

- ✓ परिशिष्ट (क) अ.क्र.१ व २ या मधील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक विजेता स्पर्धकांच्या क्रिडा मार्गदर्शक यांना रुपये १०,०००/- अनुदान.
- ✓ परिशिष्ट (क) अ.क्र.१ व २ या मधील आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक विजेता स्पर्धकांच्या क्रिडा मार्गदर्शक यांना रुपये १५,०००/- अनुदान मंजुर करणेच्या उपसुचनेस ही सभा मंजुरी देत आहे.

**क्रीडा मार्गदर्शक पात्रतेचे निकष:**

१. खेळाडुचे/ मार्गदर्शकाचे महाराष्ट्र राज्यात सलग १५ वर्षे वास्तव तसेच (अधिवास दाखला) असणे आवश्यक आहे.
२. खेळाडुने राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये अधिकृत स्पर्धेमध्ये पदक संपादन करणे आवश्यक आहे. क्रीडा मार्गदर्शकांना प्रोत्साहनपर बक्षिसे देताना संबंधित खेळाडुंच्या मुळ क्रीडा मार्गदर्शकाचा विचार करण्यांत यावा. सदर क्रीडा मार्गदर्शक हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा. तसेच पुरस्कारार्थी खेळाडुने त्याच्या मुळ क्रीडा मार्गदर्शकाचे नाव स्व:त प्रमाणित करून देणे आवश्यक आहे.
३. क्रिडा स्पर्धेत एकाच मार्गदर्शकाच्या प्रशिक्षणाअंतर्गत एका पेक्षा जास्त खेळाडू यांनी एकाच क्रीडा स्पर्धेत भाग घेवून त्या स्पर्धेमध्ये खेळाडू एका पेक्षा जास्त विजेता ठरल्यास तर देखील एका स्पर्धेच्या आधाराद्वारे क्रीडा मार्गदर्शक अनुदानास पात्र असेल.या उपसुचनेस ही सभा मंजुरी देत आहे.

सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात खेळ व संघ दत्तक घेणेसह विविध स्पर्धांसाठी खेळ व संघानें प्रायोजकत्व स्विकारणे तसेच संघाना व खेळाडूंना व्यक्तीगत अर्थसहाय्य देणे या लेखाशिर्षखाली रुपये १,००,००,०००/- इतकी करण्यांत आलेली आहे. सदर कामी होणार खर्च प्रस्तावात नमुद लेखाशिर्षा अंतर्गत करणेंस ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या महापौर कार्यालयात व क्रीडा विभागात आजमितीस प्राप्त झालेले अर्जाबाबत निकष तपासून पुढील कार्यवाही करण्यास ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

वरील प्रस्तावात नमुद नियमावली व त्याअनुसरुन द्यावयाचे अनुदान यासाठी तयार केलेले सर्वसाधारण नियम व अटी यांना अनुलक्षून महानगरपालिका हद्दीतून राज्य,राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय,व ऑलिम्पिक दर्जाचे पदक विजेते खेळाडू तयार होण्यास मदत होणार असल्याने सदर प्रस्तावात नमुद बाबींकरिता तसेच या प्रस्तावाच्या अनुषंगाने दाखल केलेल्या उपसुचनांचा या ठरावात अंतर्भाव करणेंस व त्याची अंमलबजावणी करणेंस याकामी होणाऱ्या खर्चास आजची ही सर्वसधारण सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाचे नांव -फ्रान्सिस डॉमनिक डिसोजा

व स्वाक्षरी xxx

अनुमोदकाचे नांव - माया सुबोध चौधरी

व स्वाक्षरी xxx

अनुकुल संख्या ---------------------- प्रतिकुल संख्या--------------------- तटस्थ संख्या----------------------

ठराव उपसुचनेसह सर्वानुमते मंजुर

Sd/—

(प्रविणा हितेंद्र ठाकूर)
पिठासीन अधिकारी
तथा महापौर
वसई विरार शहर महानगरपालिका

सत्यप्रत
महानगरपालिका सचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका

---

(आवश्यक नसेल ते खोडावे)